**L. A. BILL No. XLIX OF 2023.**

A BILL

FURTHER TO AMEND THE CHIT FUNDS ACT, 1982, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.

**सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४९.**

**चिट फंड अधिनियम, १९८२, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

१९८२ चा ४०. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, चिट फंड अधिनियम, १९८२, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौ-याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, चिट फंड (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.



एचबी-२१५५.

सन १९८२ चा अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ७० ची सुधारणा.

**२.** चिट फंड अधिनियम, १९८२, महाराष्ट्र राज्यास लागू असताना (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे), याच्या कलम ७० ला, त्याचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात येईल ; आणि

१९८२ चा ४०.

(क) असा नवीन क्रमांक दिलेल्या पोट-कलम (१) मधील, "राज्य शासनाकडे" या मजकुरानंतर, "किंवा त्याबाबतीत राज्य शासनाकडून **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे अधिकार प्रदान करण्यात येईल अशा अधिका-याकडे किंवा प्राधिकरणाकडे" हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल;

(ख) असा नवीन क्रमांक दिलेल्या पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलमे जादा दाखल करण्यात येतील :—

"(२) राज्य शासनास अथवा राज्य शासनाने अधिकार प्रदान केलेल्या अधिका-यास किंवा प्राधिकरणास, अपीलकाराला त्याचे अभिवेदन करण्याची संधी दिल्यानंतर, अशा अपीलात, त्यास किंवा त्याला योग्य वाटेल असे आदेश पारित करता येतील आणि असे आदेश अंतिम असतील.

(३) अशा अधिका-याला किंवा प्राधिकरणाला अधिकार प्रदान करणा-या अधिसूचनेच्या अशा दिनांकास, राज्य शासनाकडे प्रलंबित असणारी सर्व अपिले, अशा अधिका-याकडे किंवा प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यात येतील आणि जणू काही ती अशा अधिका-याकडे किंवा प्राधिकरणाकडे दाखल करण्यात आली होती असे समजून, त्या अधिका-याकडून किंवा प्राधिकरणाकडून ती निकालात काढण्यात येतील.".

सन १९८२ चा अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ७१ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७१ मधील, "राज्य शासनाने" या मजकुरानंतर, " किंवा राज्य शासनाने अधिकार प्रदान केलेल्या अधिका-याने किंवा प्राधिकरणाने" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

चिट फंडांचे विनियमन करण्याची तरतूद करण्यासाठी चिट फंड अधिनियम, १९८२ (१९८२ चा ४०) अधिनियमित करण्यात आला आहे. या अधिनियमाच्या कलम ६९ अन्वये निबंधकाने किंवा नामनिर्दिष्ट व्यक्तीने दिलेला कोणताही आदेश अथवा निबंधकाचा किंवा नामनिर्दिष्ट व्यक्तीचा निवाडा यांमुळे व्यथित झालेल्या कोणत्याही पक्षकारास, उक्त अधिनियमाच्या कलम ७० अन्वये राज्य शासनाकडे अपील करता येईल. उक्त कलमान्वये राज्य शासनाकडे मोठ्या संख्येत अपिले दाखल करण्यात आलेली आहेत आणि ती प्रलंबित आहेत.

२. म्हणून, अशी अपिले शीघ्रतेने निकाली काढण्यासाठी अशा अपिलांची सुनावणी करण्याकरिता अधिका-याला किंवा प्राधिकरणाला अधिकार प्रदान करणे इष्ट आहे, असे शासनास वाटते. वरील प्रयोजनांसाठी, चिट फंड अधिनियम, १९८२, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याखालील अपिलांची सुनावणी करण्यासाठी राज्य शासनाद्वारे अधिसूचित करण्यात येईल अशा अधिका-याला किंवा प्राधिकरणाला अधिकार प्रदान करण्याच्या दृष्टीने, त्याच्या कलम ७० मध्ये सुयोग्य सुधारणा केली आहे.

३. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,<br>दिनांक २१ नोव्हेंबर, २०२३.

**अजित पवार,**<br>उप मुख्यमंत्री.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहे :—

**खंड २.—** चिट फंड अधिनियम, १९८२ (१९८२ चा ४०), महाराष्ट्र राज्यास लागू असताना, याच्या कलम ७० मध्ये सुधारणा करण्याचा हेतू असणा-या या खंडान्वये, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अधिका-याकडे किंवा प्राधिकरणाकडे अधिकार प्रदान करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

२. वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा वर उल्लेखिलेला प्रस्ताव हा सामान्य स्वरुपाचा आहे.

## सन २०२३ चे वि. स. विधेयक क्रमांक ४९-चिट फंड (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२३

## याचे परिशिष्ट

### (चिट फंड अधिनियम, १९८२, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, यातील उतारे)

### (सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०)

**१.** ते **६९.** * * *

**७०.** कलम ६९ अन्वये निबंधकाने किंवा नामनिर्दिष्ट व्यक्तीने काढलेला कोणताही आदेश किंवा निबंधकाचा किंवा नामनिर्दिष्ट व्यक्तीचा निवाडा यामुळे व्यथित झालेला कोणताही पक्षकार राज्य शासनाकडे, आदेशाच्या किंवा निवाड्याच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या कालावधीत अपील करू शकेल. निबंधकाच्या किंवा नामनिर्दिष्ट व्यक्तीच्या निर्णयाविरूद्ध अपील.

**७१.** कोणत्याही पैशाचे प्रदान करण्यासाठी, कलम ६८ किंवा ६९ अन्वये निबंधकाकडून किंवा नामनिर्दिष्ट व्यक्तीकडून काढण्यात आलेला प्रत्येक आदेश आणि कलम ७० अन्वये अपिलात राज्य शासनाने काढलेल्या प्रत्येक आदेश यांचे पालन करण्यात आले नाही तर,– पैसे कसे वसूल करावयाचे.

(क) निबंधकाने दिलेल्या प्रमाणपत्रानुसार दिवाणी न्यायालयाचा हुकूमनामा समजण्यात येईल आणि अशा न्यायालयाचा हुकूमनामा असल्याप्रमाणे त्याच रीतीने त्याची अंमलबजावणी करण्यात येईल किंवा ;

(ख) जमीन महसुलाची थकबाकी म्हणून रकमांची वसुली करण्यासाठी, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींनुसार तयाची अंमलबजावणी करण्यात येईल :

परंतु असे की, आदेशामध्ये निश्चित केलेल्या दिनांकापासून आणि असा दिनांक निश्चित करण्यात आला नसल्यास, आदेशाच्या दिनांकापासून तीन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर खंड (ख) अन्वये अंमलबजावणी करण्यासाठी कोणताही अर्ज करण्यात येणार नाही.

**७२.** ते **९०.** * * *

**अनुसूची.** * * *

**अधिसूचना.** * * *

## महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**[ सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४९. ]**

**[ चिट फंड अधिनियम, १९८२, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[ श्री. अजित पवार,**
उप मुख्यमंत्री. **]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मुद्रणालय, नागपूर.

एचबी-२१५५.